




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १४३ ●शनिवार, दि. २३ ऑगस्ट २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# मराठ्यांची पोरं आता थांबणार नाहीत !

## सरकारने दंगल घडवली तरी मराठे मुंबईत घुसणार !



### मनोज जरांगे पाटील समर्थकासह २७ ऑगस्टला कूच करणार !

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलनाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. राज्यात पडत असलेला पाऊस यासह राज्यातील विविध भागात आंदोलनाची होत असलेली चर्चा यावर मनोज जरांगे पाटील यांनी थेट सांगितले आहे. मराठ्यांची पोर म ुंबईत घुसणारच. आता कोणत्याही परिस्थितीमध्ये माघार नाही. सरकारने दंगल घडवली तरीही मराठी मुंबईत घुसणारच अशी आक्रमक भूमिका जरांगे पाटील यांनी घेतली असून आंदोलन होणार की नाही यावर राज्यात चर्चा होत असताना कोणत्याही दिशेने मराठे थेट मुंबईत घुसणार असे आव्हान सरकारला पाटील यांनी दिले आहे.

**आम्ही आमच्या लेकरांसाठी आरक्षण मागतोय. २७ तारखेला मराठे मुंबईकडे निघणार आहेत. २९ रोजी मुंबईत समुद्रासारखी ताकद दाखवू. आमच्या लेकराला काठी लागली तर महाराष्ट्रातील सगळे रस्ते बंद पडतील, असा इशाराही मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. २९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या मोर्चावर ठाम असलेले मनोज जरांगे पाटील सातत्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर तीव्र शब्दांत टीकाही करताना पाहायला मिळत आहे. परंतु, यावेळी मनोज जरांगे पाटील खरेच मुंबई गाठणार की, मागच्या वेळेसारखे ऐनवेळी माघार घेऊन गावी निघून जाणार, असा प्रश्न चर्चिला जात असल्याचे सांगितले जात आहे.**

आंदोलनाची तयारी प्रत्येक जिल्ह्यात व गाव पातळीवर पूर्ण झाली आहे अनेक गावातून मराठा मोठ्या संख्येने मुंबईत धडकणार आहेत. बीड जिल्ह्यातून लाखोंच्या संख्येने मराठा बांधव मुंबई त जाणार असून कितीही पाऊस आला तरीही मराठे वादळ वारा सहन करत मुंबईत धडकणारच.

शिंदे समितीकडे आमच्या मागण्या नाहीत. आमच्या मागण्या राज्य सरकारकडे आहेत. शिंदे समितीवर आमची नाराजीच नाही. शिंदे समितीबाबत आमचे काही म्हणणे नाही. शिंदे समितीने ५८ लाख नोंदीचा अहवाल सरकारकडे दिला आहे. आमचे काम हे शिंदे समितीपाशी गुंतले नाही तर आता सरकारपाशी आहे. कुणबी मराठा आणि मराठा हा एकच आहे हा जीआर सरकार आता काढू शकते. शिंदे समितीने तातडीने हैदराबाद गॅजेटचा अहवाल देणे गरजेचे आहे, सातारा गॅजेट बॉम्बे गॅजेट याचाही अहवाल शिंदे समितीने सरकारला देणे गरजेचे आहे. आम्हाला शंका आहे की, शिंदे

### बीड सांगवीत तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



**आष्टी । प्रतिनिधी**

एका २३ वर्षीय तरुणाने गळफास घेत आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना आष्टी तालुक्याच्या बीड सांगवीमध्ये शुक्रवारी पहाटे दि.२२ ऑगस्ट रोजी उघडकीस आली. याबाबत आष्टी पोलिस ठाण्यात आकस्मिकमृत्यूची नोंद करण्यात आली. अविनाश बापू दिवटे असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. बीड सांगवी येथे राहणाऱ्या अविनाश बापू दिवटे या २३ वर्षीय तरुणाने राहत्या घरी शुक्रवारी पहाटे गळफास घेऊन जिवन संपवले आहे.पडवीमध्ये दोरीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केल्याच्या अवस्थेत दिसून आला.या घटनेची माहिती मयताच्या नातेवाईकांनी आष्टी पोलिसांना देताच पोलीस निरीक्षक शरद भुतेकर ,पोलीस हवालदार गणेश जगताप, बब्रुवाण वाणी,पो.ह.विकास जाधव आदींनी घटनास्थळी दाखल होत घटनेचा पंचनामा केला. या घटनेची नोंद आष्टी पोलिस ठाण्यात करण्यात आली असून मृत्यूचे कारण अद्याप कळू शकले नाही पुढील तपास पो.ह.विकास जाधव हे करत आहेत.

## राष्ट्रीय हिताच्या बातम्यांकडे दुर्लक्ष म्हणत खा. सोनवणेंनी वेधले सभागृहाचे लक्ष

### राज्यमंत्री डॉ.मुरूगन यांच्याकडून टीआरपी प्रणाली मधे बदल करण्यास मान्यता

**बीड । प्रतिनिधी**

सध्या दूरदर्शन वाहिन्यांवरील बातम्यांचे मूल्यांकन 'टीआरपी' (टेलिव्हिजन रेटिंग पॉइंट्स) च्या आधारे होत असल्यामुळे उच्च-टीआरपी मिळविणाऱ्या बातम्यांना प्राधान्य दिले जाते, तर राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या परंतु कमी टीआरपी मिळविणाऱ्या बातम्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब खा.बजरंग मनोहर सोनवणे यांनी लोकसभेत उपस्थित केली. या प्रश्नाला उत्तर देताना माहिती व प्रसारण तसेच संसदीय कामकाज राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन यांनी सरकार टीआरपी मूल्यांकन प्रणालीत बदल करण्याची गरज मान्य करत असल्याचे



स्पष्ट केले. खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभेत अनेक विषयावर महत्वाची चर्चा केली असून अलिकडे अधिक टीआरपी मिळविण्यासाठी किळसवाणे व्हीडीओज, विद्वेष पसरवणारे डिबेट्स, अनैतिक व सामाजिक विकृतीला खतपाणी घालणारे कार्यक्रम दाखविले जात आहेत. त्यामुळे निकोप समाज निर्मितीला गंभीर धोका निर्माण झाला आहे. राजव्यवस्था, धर्मव्यवस्था, समाजव्यवस्था, कुटुंबव्यवस्था आणि व्यक्तिमत्व विकास यावर प्रसारमाध्यम ांचा स्लो पोईजनिंगसारखा परिणाम होत असतो, असा मुद्दा मांडला. यावर उत्तर देताना डॉ.मुरुगन म्हणाले, नोंदणीकृत प्रेक्षक रेटिंग एजन्स्यांकडून मिळणाऱ्या डेटावर ▶▶ उर्वरित पान २ वर

## एकजुटीमुळेच काँग्रेस पक्ष मजबुत :खा.रजनीताई पाटील

**केज । प्रतिनिधी**

शिमला येथील पीटरहॉफ येथे शुक्रवार रोजी मतचोरी विरोधात रॅली काढण्यात आली. हिमाचल प्रदेश काँग्रेसच्या प्रभारी व राज्यसभा खा. रजनीताई पाटील यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना काँग्रेस पक्ष हा कार्यकर्त्यांच्या एकजुटीम ुळेच आजही सक्षम व मजबूत आहे. कार्यकर्त्यांच्या सक्रियतेम ुळेच संघटनाला नवसंजीवनी मिळते, असे प्रतिपादन काँग्रेसच्या हिमाचल प्रदेश प्रभारी व राज्यसभा खा. रजनीताई पाटील यांनी केले यावेळी हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री



सुखविंदर सिंह सुक्खू, प्रदेश काँग्रेस अध्यक्षा प्रतिभा सिंह, हिमाचल प्रदेश काँग्रेस प्रभारी खा रजनीताई पाटील आदी उपस्थित होते. यानंतर,खा. रजनीताई अशोकराव पाटील व मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांसोबत काँग्रेस आमदार ▶▶ उर्वरित पान २ वर

## मराठा आरक्षण उपसमितीचं अध्यक्षपद राधाकृष्ण विखेंकडे

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर गेल्या काही आंदोलने सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर, मराठा आरक्षण उपसमितीच्या अध्यक्षपदामध्ये मोठा फेरबदल करण्यात आला. मराठा समाजाच्या उपसमितीच्या अध्यक्षपदी आता भाजपचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची निवड करण्यात आली आहे. मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भातील विविध मागण्यांसाठी मुंबईतील आझाद



मैदानावर मनोज जरांगे आंदोलन करणार आहेत. तत्पूर्वीच हा निर्णय घेण्यात आला होता. यापूर्वी चंद्रकांत पाटील हे या उपसमितीचे अध्यक्ष होते. दरम्यान, राधाकृष्ण विखे पाटील हे पश्चिम महाराष्ट्रातील मराठा सम ाजातील प्रभावी नेते आहेत. त्यांनी यापूर्वी महसूल, शिक्षण आणि कृषी खात्यांसारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांचा राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनुभव पाहता, त्यांना ही जबाबदारी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## राज्यात पावसाची उसंत, पण 'या' १० जिल्ह्यात विजांच्या कडकडाटांसह कोसळणार पाऊस

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात पावसाचा जोर ओसरला आहे. मुंबईसह उपनगरात पावसाने उसंत घेतली असली तर राज्यातील काही भागांत पावसाचा जोर कायम आहे. कोल्हापूर, सांगली येथे पुराचा धोका टळला असला तरी पंढरपुरात अद्यापही नद्या इशारा पातळीवर वाहत आहेत. विदर्भातही विजांसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे.



तर उर्वरित राज्यात ढगाळ हवाम ानासह मुख्यतः पावसाची उघडीप राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कमी दाबाचा पट्टा सूरतगड, रोहतक, फतेहगड, गया, दिघा ते पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय आहे. उत्तर प्रदेश आणि परिसरावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. पश्चिम किनारपट्टीला समांतर कमी दाबाचा पट्टा निवळला असून बंगालच्या उपसागरात सोमवारपर्यंत हवेचा कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याचे संकेत आहेत.

राज्यात मान्सूनचा जोर ओसरला आहे. तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची हजेरी लावली आहे. आज पूर्व विदर्भात पाऊस ▶▶ उर्वरित पान २ वर

## मौजे आहेरधानोरा गावात दारू आडवी करण्यासाठी महिलांचे अजित दादांना निवेदन

### महिला सरपंच मोनिका इंगळे यांचा पुढाकार

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे आहेर धानोरा गावामध्ये देशी विदेशी दारूमुळे गावातील तरुण वर्ग व्यसनाधीश झाला असून गावा त अवैधपणे दारू विक्री वाढली आहे यामुळे शाळेत जाताना विद्यार्थ्यांना त्रास सहन



करावा लागत आहे. गावातील दारू आडवी करण्यासाठी सरपंच मोनिका बाळासाहेब इंगोले यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांना दारू आडवी




करण्यासाठी निवेदन दिले आहे.

मौजे आहेर धानोरा ता. जि. बीड येथील रहिवाशी आहोत. आमच्या गावात मोठ्या प्रमाणात देशी-विदेशी दारु विकली जाते.

▶▶ उर्वरित पान २ वर

## केज तालुक्यात चोरट्यांचा धुमाकूळ

### येवता तांड्यावर साडेचार लाखांची तर कोल्हेवाडीत अडीच लाखांची जबरी चोरी

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून तालु३यातल्या येवता तांडा येथील पत्र्याच्या शेडच्या दाराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी आतमध्ये प्रवेश करत नगदी २ लाख ६० हजार रुपयांसह १ लाख ५५ हजार रुपयांचे दागिने चोरून नेल्याची घटना २१ च्या मध्यरात्री १ ते ४ वाजण्याच्या दरम्यान घडली. तर त्याआधी २० तारखेच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी कोल्हेवाडी येथील घरामधून सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह अज्ञात चोरट्यांनी मोटारसायकल चोरून तब्बल २ लाख १५ हजार रुपयांचा ऐवज पळवल्याची घटना घडल्याने या भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर




# ग्राम विकासातून राष्ट्र निर्मिती - कृषीकुल : शेतकऱ्यांसाठी वरदान!

ग्राम विकासातून राष्ट्रनिर्मिती हे ब्रीद घेऊन जलनायक मयंक गांधी यांनी ग्लोबल विकास ट्रस्ट आणि कृषीकुल संस्थेची स्थापना केली. जागतिक दर्जाचे हे शेतकरी प्रशिक्षण केंद्र परळी वैजनाथ तालुक्यातील सिरसाळा येथे उभे आहे. १२ ऑक्टोबर २०२४ रोजी जागतिक दर्जाच्या या संकुलाचे शेतकऱ्यांच्या सेवार्थ लोकार्पण करण्यात आले. मागील दहा महिन्यात राज्यातील आणि राज्याच्या बाहेरील हजारो शेतकरी शाश्वत शेतीचे प्रशिक्षण येथून घेऊन आर्थिक उन्नतीच्या दिशेने मार्गस्थ झाले आहेत. महाराष्ट्र हे कृषीप्रधान राज्य म्हणून ओळखले जाते. पण या कृषीविश्वाचा कणा असलेला शेतकरी आजही अनेक अडचणींना सामोरा जात आहे. एका अहवालानुसार राज्यातील तब्बल ९.५ कोटी शेतकऱ्यांना अद्ययावत प्रशिक्षणाचा अभाव आहे. ही केवळ एक संख्या नसून, बळीराजाच्या प्रगतीपथावर आडवे येणारे वास्तव आहे. आजच्या युगात शेती ही केवळ जमिनीवर अवलंबून असलेली व्यवसायपद्धती राहिलेली नाही. ती आता विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि विपणन या सर्व घटकांशी निगडित झाली आहे. मात्र याबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती व प्रशिक्षणाचा गंभीर अभाव दिसून येतो. याच पार्श्वभूमीवर कृषीकुलने पुढाकार घेतला आहे. कृषीकुल शेतकऱ्यांना जलसंवर्धन, मृदा संवर्धन, विज्ञानाधारित शेती, गुणवत्तापूर्ण उत्पादन व त्याचे योग्य विपणन यांचे प्रशिक्षण देत आहे. हा केवळ ज्ञानवाटपाचा उपक्रम नाही, तर तो बळीराजाच्या विचारविश्वात बदल घडवण्याचा प्रयत्न आहे. शेतकरी हा भावनाप्रधान असतो; त्याच्या मनात योग्य विचारांची पेरणी आणि ज्ञानाची मशागत केली, तर त्यातून आर्थिक क्रांतीचे भरघोस उत्पादन घेता येते. याच उद्देशाने जलनायक मयंक गांधी यांच्या मार्गदर्शनात कृषीकुल कार्यरत आहे. यामुळेच आज शेतकऱ्यांच्या डोळ्यांत आशेचा नवा किरण दिसतो आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि बाजारपेठेतील स्पर्धेला सामोरे जाण्याची तयारी दिसून येते.

बळीराजाच्या आयुष्यातील खरी क्रांती ही अनुदानातून नव्हे, तर ज्ञानाधारित शेतीतूनच घडू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य ज्ञान व प्रशिक्षण मिळणे अत्यावश्यक आहे. सामाजिक कार्यात अनेक संस्था कार्यरत असल्या तरी, शेतकऱ्यांच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी, तेही चळवळीच्या स्वरूपात आणि उच्च दर्जाच्या सेवा पुरवणाऱ्या संस्था फारशा आढळत नाहीत. आपले राज्य कृषिप्रधान असूनदेखील, आजही बहुतांश शेती ही पावसावर व हवामानाच्या चढ-उतारांवर अवलंबून आहे. विशेषतः मराठवाडा हा भाग वारंवार अस्मानी संकटांचा सामना करणारा म्हणून ओळखला



जातो. येथे एकीकडे कोरडा दुष्काळ तर दुसरीकडे अनियमित अतिवृष्टी, यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढल्याचे पाहायला मिळते. शेतीविषयक अचूक माहिती, हवामानाचा अंदाज, योग्य तंत्रज्ञान आणि मार्गदर्शन उपलब्ध न झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. शाश्वत शेती करायची असल्यास, मातीपासून ते आकाशापर्यंत - म्हणजेच, जमिनीच्या आरोग्यापासून हवामानाच्या बदलांपर्यंत - मुलभूत ज्ञान शेतकऱ्यांना असणे गरजेचे आहे. जलसंधारण, माती परीक्षण, पीकपद्धती आदी विषयांत कृषिशास्त्राचे मूलभूत ज्ञान मिळावे, या उद्देशाने कृषीकुल मार्फत शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण शेतकऱ्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी एक प्रभावी पाऊल ठरत आहे. राज्यातील शेतकऱ्यांनी कृषिकुल प्रशिक्षण केंद्राला भेट देऊन विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित आधुनिक शेतीचे प्रशिक्षण घ्यायला निश्चितच हरकत नाही. प्रशिक्षण सेवेबद्दल किंवा कृषिकुल बद्दल अधिक माहिती हवी असल्यास शेतकऱ्यांसाठी ८२७३७३३०३०, ८२७३७३३५३५ हे क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत वरील क्रमांकावर फोन केल्यास विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने योग्य ती माहिती दिली जाते.

### ● कृषीकुल मध्ये उपलब्ध सुविधा

१. वनस्पती रोग शास्त्र व कीटक शास्त्र प्रात्यक्षिक कक्ष
२. मृदा आणि विज्ञान प्रयोगशाळा
३. शेती उपयोगी अवजार गृह
४. ई लर्निंग लॅब
५. स्वयंचलित हवामान केंद्र
६. मृदा संवेदक
७. आयुर्वेदिक वनस्पती उद्यान
८. स्मार्ट सिंचन प्रणाली
९. रेशीम कीटक संगोपन केंद्र
१०. सेंद्रिय निविष्ठा कक्ष



११. निर्जलीकरण / शेतमाल मूल्यवर्धन कक्ष
१२. पाणलोट व्यवस्थापन स्टुडिओ
१३. शीतगृह
१४. बायोगॅस तंत्रज्ञान
१५. गौ आधारित शेती
१६. प्रात्यक्षिक प्लॉट्स

### ● कृषीकुल काय करते?

वैदिक काळातील शिक्षण पंचकूल मध्ये केले जात होते. गुरुकुल, गोकुल, वृक्षकुल, ऋषिकुल आणि कृषिकुल. याच मूलभूत विचारावर ग्लोबल विकास ट्रस्ट काम करते. कृषिकुलमध्ये शेतकऱ्यांच्या कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम, परिसंवाद आणि शेतकरी मेळावा आदी कार्यक्रम घेतले जातात. २०० शेतकऱ्यांसाठी मोफत निवासी प्रशिक्षण व्यवस्था असून, जल, मृदा, शेती संलग्न प्रशिक्षण इथे देण्यात येते. परळी वैजनाथ तालुक्यातील सिरसाळा - पोहनेर रोडवर हे भव्य संकुल उभारण्यात आले आहे. इथं पोचण्यासाठी परळी वैजनाथ येथे रेल्वे किंवा बसने येता येते. तसेच जवळच छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) आणि नांदेड ही जवळची विमानतळे आहेत.

### ● शेतकऱ्यांसाठी संदेश...!

चला आपल्याला देश बदलायचा आहे... मोठे परिवर्तन घडवायचे आहे... शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावून त्यांना आर्थिक सक्षम करायचे आहे. यासाठी जलनायक मयंक गांधी यांनी उभारलेली ग्लोबल विकास ट्रस्ट आणि कृषीकुल ही संस्था काम करते. बदलते वातावरण, मातीची झालेली दुरावस्था ठिकठाक केली आणि शाश्वत शेतीला आधुनिक तंत्रज्ञानांची जोड दिली तरच शेतकऱ्यांची उन्नती होणे शक्य होणार आहे. कृषिकुलमध्ये आजपर्यंत १० महिन्यांत १० हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी मोफत प्रशिक्षण घेतले. पारंपरिक शेती करणारे शेतकरी यामुळे आधुनिक आणि



तंत्रशुद्ध शेती करू लागले. याचा परिणाम असा झाला की त्यांच्या पूर्वीच्या उत्पन्नात तब्बल दहा टक्के वाढ झाली. जवळपास असे २८ हजार शेतकऱ्यांचे उत्पन्न ३० हजारांहून ३ लाखांपर्यंत उंचावले आहे. कृषीकुलमध्ये येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला मोफत प्रशिक्षण दिले जाते. त्याचबरोबर पिकाची लागवड म्हणजेच सुरुवात केल्यापासून ते विक्री करेपर्यंत त्यांना योग्य असे मार्गदर्शन केले जाते. शेतकरी बांधवांना आवाहन करण्यात येते की आपण कृषिकुलमध्ये या... आधुनिक शेतीचे प्रशिक्षण घ्या आणि प्रगतीची कास धरा. कृषीकुलची उभारणीच मुळात शेतकऱ्यांसाठीच्या समर्पित भावनेने झालेली आहे. जागतिक दर्जाची ही संस्था आपल्यासाठीच आहे... आपल्या उन्नतीसाठीच आहे. अधिक माहितीसाठी शेतकरी बांधव ८२७३७३३०३०, ८२७३७३३५३५ या क्रमांकावर संपर्क करून अधिक माहिती मिळवू शकतात.

### ● कृषीकुलची वैशिष्टे?

प्रत्येक पिकाच्या ४-५ प्रकारांसह प्रत्यक्षिकाचे २१ प्लॉट.

रेशीम शेती शेड, गोशाळा, बायोगॅस युनिट, कंपोस्ट शेड, केंद्रीकृत सिंचन प्रणाली, हवामान केंद्र आणि माती सेन्सर इ.

माती, कीटक, रोग, अनुकूल कीटक तसेच जीवाणू आणि बुरशी याबद्दल तांत्रिक माहिती दर्शविणाऱ्या प्रयोगशाळा.

कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्रे आणि शेतकरी मेळावे आयोजित करण्याची क्षमता.

पाणी, माती आणि शेतीशी संबंधित प्रशिक्षण.

२०० शेतकऱ्यांसाठी निवासी प्रशिक्षण व्यवस्था.

### ● कृषीकुलची उद्दिष्टे

महाराष्ट्रातील तसेच देशातील शेतकऱ्यांपर्यंत कृषी क्षेत्राचे ज्ञान पोहोचवणे.

शेतकऱ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल जागरूकता निर्माण करणे.

शेतकऱ्यांची शेतीमध्ये उद्योजकीय मानसिकता विकसित करणे.

देशभरातील शेतकऱ्यांसाठी शाश्वत शेती प्रणालीचे मॉडेल स्थापित करणे.

-दत्तात्रय काळे (९५५८४८८६८६)

◆ पान ४ वरून पुढे...

## मराठ्यांची पोरं...

समितीला हा अहवाल देवेंद्र फडवणीस देऊ देत नाहीत, असा मोठा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला. मराठा समाज मागील अनेक वर्षांपासून आरक्षणाची मागणी करीत आहे. परंतु, आजपर्यंत समाजाला न्याय देण्यात आलेला नाही. अनेकवेळा चर्चा झाल्या आहेत. त्यामुळे आता चर्चेला संधी नसून, २९ ऑगस्टला मराठा समाज सरसकट ओबीसीतून आरक्षणच घेणार असल्याचे मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील मोर्चावरून अनेक तर्क-वितर्क सुरू आहेत. तसेच राजकीय वर्तुळात चर्चाही रंगल्या आहेत. २७ ऑगस्टला मनोज जरांगे पाटील समर्थकांसह मुंबईकडे कूच करणार आहेत. २८ ऑगस्टला सायंकाळी ते नवी मुंबईत दाखल होतील. त्यांच्यासोबत लाखो आंदोलक असल्याने पालिका, पोलिसांची पुन्हा कसोटी लागणार हे नक्की. पण, गेल्या वर्षी त्यांनी अशाच आंदोलनाच्या निमित्ताने मुंबईकडे कुच केली खरी पण, ऐनवेळी माघार घेत वाशीतून पुन्हा गाव गाठले होते. हे त्यांच्या समर्थकांच्या स्मरणात हे असेल. सरकार दंगल घडवून आणणार असेल तरी आम्ही तसे होऊच देणार नाही. मुंबईत पण जाणार आहे. अतिशय शांततेत तेथे जाणार आहोत. आम्हाला मुंबईत आमच्या मागण्यांसाठी जाण्याचा अधिकार आहे. आता मराठे खवळून उठले. सरकारने मला एकटे पाडण्याचा प्रयत्न केला; पण समाज सोबत असल्याने मी भीत नाही. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मराठा तरुण मुंबईला जाण्यावर ठाम आहेत. मराठ्यांची पोरं आता थांबणार नाहीत. आरक्षण घेतल्याशिवाय कुणाचेही ऐकणार नाहीत, अशी मनःस्थिती समाजाची आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी आरक्षण द्यावे, आम्ही मुंबईला येत नाही, अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी मांडली होती.

## राष्ट्रीय हिताच्या...

आधारित असलेली विद्यमान प्रणाली सुधारण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी मंत्रालयाने टीआरपी मोजणीसंदर्भातील विद्यमान धोरण मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सुधारणा करण्याचा मसुदा संकेतस्थळावर सार्वजनिक चर्चेसाठी प्रसिद्ध केला आहे. सरकारच्या मते या सुधारणा केल्यामुळे न्याय्य स्पर्धेला प्रोत्साहन मिळेल, अधिक अचूक व प्रतिनिधिक डेटा निर्माण होईल, देशभरातील प्रेक्षकांच्या विविध व बदलत्या माध्यम वापराच्या सवयींचे योग्य प्रतिबिंब दिसेल. त्यामुळे टीआरपी मूल्यांकनात गुणात्मकतेलाही महत्त्व दिले जाईल आणि अनैतिक स्पर्धेला आळा बसण्याची अपेक्षा आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी सामाजिक विकृतीला खतपाणी घालणारे कार्यक्रम दाखवू नयेत, अशीही मागणी केली. विकासात्मक विषयासोबतच सामाजिक स्वास्थ बिघडण्यास कारणीभूत ठरणाऱ्या विषयावर खा.सोनवणे यांनी केंद्र सरकारचे लक्ष वेधले. अधिवेशनाच्या सुरुवातीलाच खा.सोनवणे यांनी उल्लू टीव्ही या चॅनलवरील विकृत कार्यक्रमांचे प्रसारण बंद करण्यात महत्वाची भूमिका निभावली होती. यानंतर राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन यांनी सरकार टीआरपी मूल्यांकन प्रणालीत बदल करण्याची गरज मान्य करत असल्याचे स्पष्ट केले.

## एकजुटीमुळेच...

दलाच्या बैठकीत सहभाग घेतला. या बैठकीत येत्या काळात पक्षाच्या वतीने आयोजित होणाऱ्या कार्यक्रमांवर सविस्तर चर्चा झाली तसेच संघटन अधिक मजबूत करण्यासाठी ठोस रणनीती आखण्यात आली. आम्ही पूर्ण समर्पण आणि एकजुटीने काँग्रेस पक्षाची मजबुती, तसेच राज्याची सेवा आणि विकासासाठी सातत्याने कार्य करत राहू मत व्यक्त केले. त्या पुढे म्हणाल्या की, कार्यकर्त्यांमधील परस्पर सहयोग आणि निष्ठा हेच पक्षाच्या बळाचे प्रमुख स्तंभ आहेत. स्थानिक पातळीपासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत काँग्रेस पक्षाने नेहमीच लोकांच्या हितासाठी काम केले आहे. सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकास आणि शेतकरी-श्रमिकांचे प्रश्न सोडविण्याची भूमिका काँग्रेसने घेतली आहे असे मत व्यक्त केले.

## मराठा आरक्षण...

मराठा समाजाला शिक्षण आणि नोकरीत १० टक्के आरक्षण देण्याचा कायदा फेब्रुवारी २०२४ मध्ये मंजूर झाला असला, तरी त्यावरून अजूनही वाद आणि कायदेशीर आव्हाने कायम आहेत. या पार्श्वभूमीवर, विखेंच्या नियुक्तीमुळे मराठा समाजाच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी नवे प्रयत्न होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या उपसमितीमार्फत मराठा आरक्षणाशी संबंधित प्रशासकीय आणि वैधानिक कामकाजाचा समन्वय ठेवण्यात येणार आहे. न्यायालयीन प्रकरणांमध्ये सरकारच्या वतीने बाजू मांडण्यासाठी नियुक्त केलेल्या वकिलांशी समन्वय ठेवण्यात येणार आहे. तसेच न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या समितीशी समन्वय साधणे. मराठा आंदोलन आणि त्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा करणे. जात प्रमाणपत्र देण्यातील अडचणींबाबत निर्णय प्रक्रिया सुलभ करणे. मराठा समाजासाठी बनवलेल्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे, तसेच सारथी आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत मराठा समाजासाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांचा आढावा घेणे, अशी कामे मराठा आरक्षण उपसमितीकडून केली जातील. विखे पाटील यांनी नियुक्तीनंतर सांगितले की, ते मराठा समाजाच्या हितासाठी आणि सरकारच्या धोरणांनुसार काम करतील. तसेच, ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यावर आपला भर असेल, असं ते म्हणाले.

## राज्यात पावसाची...

हजेरी लावू शकतो. बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यांत विजांसह पाऊस बरसू शकतो. हवामान विभागाने या भागात यलो अलर्ट जारी केला आहे. तर, उर्वरित राज्यात ढगाळ हवामान राहिल तसंच, हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, पंढरपूर येथील पुराचा धोका टळला आहे. उजनी आणि वीर धरणातून भीमा आणि नीरा नदीत सोडलेल्या पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात कमी केला.उजनी धरणातून ३० हजार तर वीर धरणातून १५ हजार क्युसेक पर्यंत कमी झाला. आज दुपार नंतर पंढरपूर मधील भीमा नदीची पाणी पातळी कमी होण्यास सुरुवात होईल.

## मौजे आहेरधानोरा...

आहेरधानोरा ता. जि. बीड या गावातील पुरुष वर्ग तसेच विद्यार्थी ही दारुमूळे व्यसनाच्या मोठ्या प्रमाणावर बळी पडत आहेत. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. त्याचप्रमाणे हा पुरुष वर्ग दारुचे सेवन केल्यानंतर घरी गेल्यावर, घरातील महिलाबरोबर वाद । तंटे करीत आहेत. या गावातील दारुमुळे व्यसनी झालेल्या लोकांमुळे शाळेत येणाऱ्या-जाणाऱ्या विद्यार्थींना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यांची कुचंबना होत आहे. त्यामुळे काही विद्यार्थ्यांनी शाळा देखील सोडल्या आहेत.वरील दारुच्या समस्येमुळे आम्ही सर्व महिलांची एकच विनंती आहे की, आम्ही अर्ज केल्याप्रमाणे आमच्या गावातील दारुची उभी बाटली आडवी करण्यासाठी महिलांचे मतदान घेण्यात यावे व त्यातून दारुची उभी असलेली बाटली आडवी करावी . अशा प्रकारचे निवेदन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादांना गावातील महिलांनी दिले आहे. या निवेदनावर मोनिका बालासाहेब इंगोल,कल्पना अमोल फाटक, विशला राहुल यखेमाडे,छाया राजेंद्र दोमाठे,प्रियंका अजिनाब बनसोडे,मालन चागदव भोसले,आश्विनी रविंद्र इंगोले,पल्लवी ज्ञानेश्वर इंगोले,सुनीता गणेश इंगोले, सुमीत्रा हाणुमाण इंगोले,पल्लवी संतोष वळे, संगीता बहु नवले, 'पुजा इंगोले,जमुना वसत इंगोले,नम्रता विशाल इंगोले, नीता बलभीम नवले,सरिता समाधान वडमारे, उमा विलास फारक,मुक्ता ईश्वर फाटक, चंचळा काशीनाथ इंगोले,सांळबाई नारायण खमाई, सुनिता सुधाकर खगाडे, आधी महिलांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## केज तालुक्यात...

याबाबत अधिक असे की, गेल्या दोन दिवसांमध्ये केज तालुक्यात कोल्हेवाडी व येवता तांडा या ठिकाणी अज्ञात चोरट्यांनी चोऱ्या करून या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण करून सोडले आहे. येवता तांडा येथील आत्माराम बन्सी राठोड यांच्या पत्र्याच्या शेडच्या घराचे दरवाजे तोडून चोरट्यांनी आतमध्ये प्रवेश केला. घरामधून ५०० च्या तब्बल २०७ नोटा व शंभरच्या ३०० नोटा असे एकूण २ लाख ६० हजार रुपये व सोन्या चांदीचे दागिने असा तब्बल ४ लाख ३२ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी आत्माराम राठोड यांच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गु.र.नं. ४५५/२०२५ कलम ३३१ (४), ३०५ भारतीय न्यायसंहितानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे तर कोल्हेवाडी येथे बाबासाहेब दैवत मिसाळ यांच्या घरी २० तारखेला चोरी झाली. मिसाळ यांचे घर उघडे होते. अज्ञात चोरट्यांनी घरामध्ये प्रवेश करत एक मोटारसायकलसह घरातले सोने-चांदीचे दागिने असा एकूण २ लाख १५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. या प्रकरणी केज पोलिसात मिसाळ यांच्या फिर्यादीवरून गु.र.नं. ४५६/२०२५ कलम ३०५ (१), ३०३ (२) भा.न्या.संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## वारकरी संप्रदायाचा...

संप्रदायाचे ते एक भाग बनले. त्यांचे अनेक अभंग, व चरित्रात्मक माहिती याबाबत अनेक संतांच्या अभंगातून समाजासमोर आलेले दिसून येते. असे विचार व्यक्त केले. तर केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ.नमिताताई अक्षय मुंदडा यांनी सांगितले की, संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांप्रमाणेच संत सेना महाराजांना ही श्रेष्ठ मानले जाते. संत सेना महाराजांचे अभंग मोठ्या आवडीने आजतागायत गायले जातात. सेना महाराजांनी हजारो अभंगांची निर्मिती करून 'सैनपंथ' नांवाची चळवळ भारतात सुरू केली. हीच चळवळ आज महाराष्ट्रात वारकरी चळवळ म्हणून प्रसिद्ध आहे. संत सेना महाराजांनी समतेचा विचार मांडला असे गौरवोद्गार आमदार सौ.मुंदडा यांनी काढले. या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून माजी उपनगराध्यक्ष दिलीप सांगळे, बापूसाहेब टाक, हनुमंत दहिवाळ, बबन दहिवाळ, राजेश पंडित, ॲड.किशोर गिरवलकर, कालिदास मैड, हिंदुलाल काकडे, भाजपाचे शहराध्यक्ष संजय गंभीरे, ॲड.दिलीप चामनर, अनंत अरसुळे आदींची उपस्थिती होती. किर्तन व भजनाचे मानकरी प्रा.विजयकुमार बिदरकर, भिमराव बाबुराव कचरे हे होते. त्यानंतर दुपारी १२ ते दुपारी २ वाजता या वेळेत सुप्रसिद्ध गायक सुभाष शेप व संच यांचा भक्तीगितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यानंतर उपस्थित सर्वांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाभिक महामंडळाचे संघटक कविराज कचरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार नाभिक एकता कर्मचारी महासंघाचे स्थानिक अध्यक्ष डॉ.केशवराव राऊत आणि नवनाथ राऊत यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री संत सेना महाराज प्रतिष्ठाण, राष्ट्रीय नाभिक एकता महासंघ, अंबाजोगाईचे अध्यक्ष मधुकर सुरवसे, जिवराज गवळी, भिमराव कचरे, परमेश्वर गवळी, अजिंक्य राऊत, संतोष गवळी, राजकुमार जाधव, संभाजी राऊत, अभिराज गवळी, नरसिंग वाटकर, ज्येष्ठ मार्गदर्शक माणिकराव हारणे, निवृत्तीराव कचरे, गोविंद कचरे, प्रा.बिदरकर सर, सौदागर काळे, डिगांबर माने यांच्यासह सर्व समाज बांधवांनी पुढाकार घेतला होता.

## बजरंग बली की...

समजल्या जाणाऱ्या श्रावण महिन्याचा शेवटचा दिवस व शनिची उपासना करण्याचा उत्तम दिवस समजल्या जाणारा शनि अमावास्या अश्या दुर्लभ योग येत्या शनिवारी दिनांक २३ ऑगस्ट रोजी येत असल्याने या दिवशी भगवान महाबली हनुमानाचे उपासना केल्याने पुण्य लाभते अशी हिंदू धर्मात मान्यता आहे, याच दिनाचे पर्व साधून शहरातील राष्ट्रप्रेरित विचारांच्या युवकांनी सामूहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रम घेण्याचे योजिले आहे. या कार्यक्रमास शहरातील ११०० युवक, महिला, विद्यार्थी, प्रौढ हिंदु बांधव सहभागी होणार असुन शहरातील पेठ बीड भागातील हिरालाल चौकात याची जय्यत तयारी करण्यात येत आहे.

## अंतर राष्ट्रीय...

सूत्रसंचालन अमोल घोडके समुपदेशक जिल्हा रुग्णालय बीड तर श्री एफ आर फारुकी यांनी आभार प्रदर्शन केले सदर रॅलीसाठी डॉक्टर लक्ष्मीकांत तांदळे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉक्टर हनुमंत पारखे बालरोगतज्ञ प्राचार्य डॉक्टर सुवर्णा बेद्रे नर्सिंग कॉलेज बीड डॉक्टर अरुण राऊत वैद्यकीय अधिकारी RT सेंटर बीड डॉक्टर दीपक राऊत डॉक्टर नाईकवाडे मॅडम सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे सहाय्यक अधीक्षक श्री प्रकाश सानप आयसीटीसी डापको ए आर टी डी एस आर सी रक्तपेढी कर्मचारी, स्वाधार गृह, One stop centre, लिंक वर्कर प्रकल्प ग्रामीण विकास मंडळ, कर्मचारी अधिकारी यांची उपस्थिती होती सदर कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नाने व समन्वयाने बाईक रॅली संपन्न झाली. सदर बाईक रॅलीसाठी पत्रकार बंधू सामाजिक कार्यकर्ते तसेच बीड शहर पोलीस तसेच बीड शहर पोलीस यांचे विशेष सहकार्य लाभले.

## मोकाट कुत्र्यांचा....

कुत्रे हल्ले करत असल्याने शहरात प्रवास करणे आता धोक्याचे झाले आहे. अंबाजोगाई नगरपरिषद हद्दीमध्ये नगर परिषद प्रशासनाने पाहिजे तसे लक्ष न दिल्याने मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. याकडे नगर परिषदेने लक्ष द्यावे व निर्बिजीकरण व भटक्या कुत्र्याच्या बंदोबस्त करावा, अशी मागणी डीवायएफआय संघटनेच्या वतीने प्रसिद्धी पत्राद्वारे केली आहे. अन्यथा घटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात...

### सोमवारी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज मस्के यांची प्रवचन सेवा

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होत आहे. या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक २५/८/२५ रोजी रात्री ८ते९ या वेळेत ह भ प ज्ञानेश्वर महाराज मस्के यांची प्रवचन सेवा होणार आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंट वरून होणारअसून,या चातुर्मास उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचन श्रवणनाच लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प माधव महाराज डाके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### पद्मश्री डॉ. लहाने करणार संपादक गावरस्करांचा सन्मान ; सत्कार सोहळ्याची जय्यत तयारी सुरू



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे सुपुत्र ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर अण्णा यांना मराठी पत्रकार परिषदेचा नागोजीराव दुधगावकर स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचा भव्य नागरी सत्कार रविवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जालना रोडवरील हॉटेल अन्वीता येथे पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या सत्कार सोहळ्याची गावरस्कर प्रेमी आणि मराठी पत्रकार परिषद पदाधिकाऱ्याकडून जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे या सत्कार सोहळ्याला जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्यासह सर्व सन्माननीय संपादक उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे माजी विभागीय सचिव दिलीप खिस्ती, विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय आरबुणे ,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर ,जिल्हा समन्वयक अभिमान्यु घरत, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत राजहंस, सचिन पवार,अविनाश कदम, जुनेद बागवान, दिलीप झगडे, संजय रानभरे, गौतम बचुटे ,कादर मकरानी , तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, मधुकर तौर, जालिंदर नन्नवरे ,अजय जोशी, हरीश यादव, विजय आरकडे, सतीश सोनवणे, मंगेश नीटूरकर, प्रशांत लाटकर आदींनी केले आहे.

### करचुकवेगिरी प्रकरणात दोन जणांना अटक 30 कोटी ५२ लाख रुपयांची फसवणूक

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र जीएसटी विभागाने देवरा एक्झिम एलएलपी या फर्मचे भागीदार मेहुल जैन व ऑपरेटर कमलेश जैन यांना ३० कोटी ५२ लाख रुपयांच्या करचुकवेगिरी प्रकरणात अटक केली. आरोपींनी चुकीची इनपुट टॅक्स क्रेडिट (ITC) वजावट घेतल्यामुळे शासनाची महसूल हानी झाली. न्यायालयाने त्यांना ४ सप्टेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली. कारवाईदरम्यान व्यापाऱ्याने चुकीची इनपुट टॅक्स क्रेडिट वजावट केल्यामुळे शासनाची महसूल हानी झाल्याचे आढळून आले. राज्यकर सहआयुक्त संजय पवार आणि उपायुक्त स्वप्नाली जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सतीश पाटील, शरदचंद्र पोहनकर, भूपेन्द्र वळवी, मनोहर कनकदंडे यांनी ही कारवाई केली. संबंधित आरोपी करदात्याची कृती महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायदा, २०१७ व संबंधित नियमांचे सरळ उल्लंघन आहे. अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी, मुंबई यांनी आरोपींना ०४ सप्टेंबर २०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभाग आधुनिक नेटवर्क विश्लेषण साधनांचा वापर करून व इतर शासकीय विभागांशी समन्वय साधून कर चुकवेगिरी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर सतत लक्ष ठेवत आहे.

### आयुष्मान भारत योजनेचा लाभ वेळेत द्यावा : पालकमंत्री संजय शिरसाट

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

आरोग्य विभागाच्या विविध योजनांचा लाभ गरजू रुग्णांना वेळेत मिळावा यासाठी आयुष्यमान भारत योजनेचा लाभ वेळेत द्यावा, त्यासाठी रुग्णालयांनी तत्पर रहावे,असे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री शिरसाट यांनी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा आढावा घेतला. बैठकीस खासदार डॉ.भागवत कराड, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, महानगरपालिकेचे आयुक्त जी .श्रीकांत, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके , निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर ,महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ.रवी भोपळे यांच्यासह आरोग्य यंत्रणातील संबंधित अधिकारी या बैठकीत उपस्थित होते. जिल्ह्यात एकूण ८१ रुग्णालय हे प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तसेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या उपचारासाठी संलगनीत असून या योजनेचा लाभ गरजू रुग्णांना रुग्णालयाच्या माध्यमातून देण्यात येतो. रुग्णालयाने विविध कागदपत्राच्या अभावी रुग्णास वेठीस धरू नये. आलेल्या रुग्णास वेळेत उपचार करून आरोग्य सेवा देण्याचे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिले .संबंधित नोंदणीकृत रुग्णालयांमध्ये रुग्णांना होणारी गैरसोयी टाळावी.त्याचप्रमाणे रुग्णांना उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयावर आरोग्य विभाग व जिल्हा प्रशासनाने कारवाई करावी, असे निर्देश पालकमंत्री शिरसाट यांनी दिले.

# शिंपेगावचे दत्त संस्थान भाविकांचे श्रद्धास्थान दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी

## पंचक्रोशीत संस्थानचा वाढता नावलौकिक ; प्रत्येक गुरुवारी असते महाप्रसादाचे आयोजन

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील शिंपेगाव हे गाव गेल्या काही वर्षांत अध्यात्मिक केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. येथील दत्त संस्थान हे पंचक्रोशीतले श्रद्धास्थान मानले जाते. दर गुरुवारी भाविकांची येथे मोठी गर्दी होत असते. श्रावण महिन्याच्या चौथ्या गुरुवारी (दि.२१) रोजी संस्थानात भाविकांचा जनसागर उसळला होता. गुरुवारी सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. संस्थान परिसरात जय श्री दत्तात्रयांच्या जय घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. दरम्यान संस्थानचे पूज्य हनुमान महाराज यांच्या हस्ते श्री दत्तगुरु व श्री



गुरु दिगंबर बाबा यांच्या समाधीवर अभिषेक व पूजन विधी पार पडले. यानंतर महाराजांनी भाविकांना अध्यात्मिक संदेश देत जीवनात संत मार्गाचा स्वीकार करण्याचे महत्त्व पटवून दिले. महाराजांच्या कीर्तनसदृश संदेशाने उपस्थित भाविक भावविभोर झाले.

यानंतर संस्थानात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कोळगावचे सुपुत्र डॉ. राजेश घाडगे यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी हजारो भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. दरम्यान डॉ. राजेश घाडगे यांचा हनुमान महाराजांच्या हस्ते सत्कारही करण्यात आला. महाराजांनी पुढील वर्षभराच्या अन्नदान पंगतीचे नियोजन पूर्ण झाल्याचे सांगत, समाजातील प्रत्येक घटकाने एकमेकांना साथ देण्याची गरज अधोरेखित केली. तर शिंपेगाव दत्त संस्थानचा लौकिक दिवसेंदिवस वाढत असून, केवळ पंचक्रोशीतील नव्हे तर विविध भागांतूनही भाविक येथे दर्शनासाठी दाखल होत आहेत. प्रत्येक गुरुवारी संस्थान परिसर भक्तिमयतेने उजळतो. येथे आल्यावर मनाला शांती मिळते, समाधान लाभते आणि पुन्हा येण्याची ओढ लागते, अशी डॉ. राजेश घाडगे यांनी व्यक्त केली. दरम्यान श्रावण महिना असल्याने भाविकांची गर्दी लक्षणीयरीत्या वाढली होती. दर्शनासाठी महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर दिसून आली. अनेक कुटुंबांनी लहान मुलांसह संस्थानात हजेरी लावली होती. शिंपेगाव दत्त संस्थान हे श्रद्धा, अध्यात्म आणि सेवाभाव यांचे सुंदर संगम बनले असून, भाविकांसाठी ते खऱ्या अर्थाने समाधानाचे ठिकाण ठरत आहे.

## 'देवाभाऊ' अभियानातून माजलगाव तालुक्यातील लाडक्या बहिणींच्या २८५५ राख्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्त

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यात 'आमचा देवाभाऊ' विशेष अभियान उत्साहात राबविण्यात आले. मा.ना. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या अभियानात तालुक्यातील हजारो लाडक्या बहिणींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांना आपले प्रेम व आपुलकी व्यक्त केली. या कार्यक्रमाच्या प्रसंगी अनेक महिलांनी पत्राद्वारे देखील देवा भाऊचे लाडक्या बहिणीला असलेले सहकार्य याबद्दल देवा भाऊ विषयी कृतज्ञता व्यक्त केली.




खरोखरच महाराष्ट्र राज्यासाठी व महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी सुरक्षिततेसाठी सन्मानासाठी व आमच्या लाडक्या बहिणीसाठी विविध योजना देत आहेत , त्यामुळे आमचे देवा भाऊ आमच्या सर्व भगिनींसाठी एक आदर्श भाऊ आहेत अशी प्रतिक्रिया तुलसा कुलकर्णी सह विविध भगिनीं यांनी पत्राद्वारे दिली.

या अभियानासाठी कीट्टी आडगाव मंडळ माजलगाव तालुका अध्यक्षा सौ. रूपाली कचरे, माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी, यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रिय परिश्रम घेतले. राख्या संकलन मोहिमेत श्वेता ठोसर, अनिता लोखंडे, अमृताताई, गौरीताई देशमुख, पूजा मुंडकर या बहिणींसह गणेश सातपुते, सिद्धेश्वर राठोड,कल्याण शेप, सुधाकर रासवे, मनोज कोरडे, सचिन तौर, संजय पवार, दीपक गरड, मल्हारी ढगे आदींनी विशेष योगदान दिले.



*रोहतवाडी ता. पाटोदा येथे कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभाती तथा सरपंच पांडुरंग नागरगोजे बैल पोळा साजरा करताना. भारत शेतीप्रधान देश असून आज आधुनिक यंत्र सामुग्रीच्या जोरावर पीक पद्धतीच्या बदलाने नव नवीन प्रयोग, नव नवीन सुधारित बियाणे वापरून अन्नदाता सुखी होण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न सुरू असताना पंरपरागत शेती साठी सर्जा राजा ची आज फार दुर्मिळता झाली आहे, या ही परिस्थिती मध्ये अनेक कृषक बांधव गावोगावी आपली बैल जोडी अत्यंत सुबक व चांगली कामगिरी करणारी पाळत व त्याची निगा करत आहे. या आजच्या पवित्र सण प्रसंगी माझ्या गावातील कृषक व सर्जा राजा चा एक क्षण.*

## अनुष्का वारंगुळे हिचे नीट परिक्षेत यश, आर्मीमध्ये डॉक्टर होण्याचे स्वप्न होणार साकार

**आष्टी । प्रतिनिधी**

भारतीय सैन्यदलातील लक्ष्मिकांत वारगुळे या अधिकाऱ्यांची कन्या व कै अर्जुन सदाशिव वारंगुळे यांची नात अनुष्का वारंगुळे यांनी राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा नीट २०२५ मध्ये उत्कृष्ट गुण मिळवून आपल्या झळाळीच्या यशाने आपल्या कुटुंबासह समस्त शहरास गौरवाची भावना दिली आहे. त्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एम बी बी एस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला आहे.

अनुष्का ह्या लष्करी अधिकारी (जेसीओ) वारंगुळे लक्ष्मीकांत अर्जुन आणि पल्लवी वारंगुळे यांच्या कन्या आहेत. लष्करी पार्श्वभूमीमुळे देशातील विविध राज्यांमधील आर्मी पब्लिक स्कूलमध्ये त्यांचे शिक्षण झाले. त्यांनी दहावीची परीक्षा सी बी एस ई बोर्डामधून ९६ टक्के गुणांसह उत्तीर्ण केली. त्यानंतर,



त्यांनी सिंधफणा पब्लिक स्कूल माजलगाव मध्ये प्रवेश घेतला. तेथे त्यांनी १२ वीची परीक्षा ९४.२% गुणांसह उत्तीर्ण करून संपूर्ण शाळेमध्ये सर्वोच्च स्थान मिळवले. या शैक्षणिक यशामुळे त्यांना अंबेजोगाई येथे सन्मान समारंभात गौरविण्यात आले. फक्त शालेय शिक्षणातच नव्हे, तर त्यांनी एकाच वेळी दोन महत्त्वाच्या राष्ट्रीय पातळीच्या परीक्षा दिल्या. CUET (कॉमन युनिवर्सिटी एंट्रन्स टेस्ट) मध्ये त्यांना ९५०.८२ पैकी १२५० गुण मिळाले, ज्यामुळे दिल्ली विद्यापीठासारख्या top universities मध्ये प्रवेश मिळणे निश्चित झाले. तथापि, त्यांचे लक्ष नीट कडे होते, जे त्यांनी उत्तीर्ण केले आणि एम बी बी एस च्या शासकीय जागेसाठी पात्र ठरल्या.



*वडवणीचे नगराध्यक्ष शेषेराव बापू जगताप, युवा नेते भारत दादा जगताप, सुग्रीव मुंडे, शांतीलाल पवार, सर्व कुटुंबीय, आप्तेष्ट व मित्रपरिवारच्या उपस्थित बैल पोळा साजरा करण्यात आला.*



*शौर्या शशांक धन्वे यांचा एस पी इंग्लिश स्कूल येथे शैक्षणिक साहित्य वाटप करून आठवा वाढदिवस उत्साहात साजरा. यावेळी आई-वडील ,मामा मामी, आजी आजोबा, वर्गशिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते व यांच्या उपस्थितीत शैक्षणिक साहित्य वाटप करून शौर्या धन्वे यांचा आठवा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला*

## ९ सप्टेंबरला महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका व मदतनिस महासंघाचा मुंबईत भव्य मोर्चा

**बीड । प्रतिनिधी**

अंगणवाडी सेविका व मदतनिस यांच्यावर सरकारकडून टाकण्यात येणाऱ्या वाढत्या कामाच्या ताणाविरोधात महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका व मदतनिस महासंघाने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. एफआरएस, पोषण ट्रॅकर ॲप, प्रधानमंत्री मातृवंदना योजना व 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे फेरसर्वेक्षण यांसारखी जबाबदारी अंगणवाडी ताईंवर लादू नये, अशी ठाम मागणी करत येत्या ९ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता आझाद मैदान, मुंबई येथे भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष भगवान देशमुख , प्रदेश उपाध्यक्ष कमल बांगर, राज्य संघटक दत्ता देशमुख, बीड जिल्हा संघटक सचिन अंधळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# रस्ते, स्वच्छता, लाईट, पाणीसाठी जिल्हाधिकारी व मुख्याधिकारींकडे निवेदन: खुर्शीद आलम

**● जलील खान, रफिक नाशाद, शेख तैय्यब, अखीलभाई या शिष्टमंडळाने घेतली भेट**

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नागरिकांच्या मुलभूत सुविधांसाठी नागरिकांच्या वतीने शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी साहेब आणि मुख्याधिकारी साहेब यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले आहेत, निवेदनात म्हटले



आहे की बीड शहरात अस्वच्छता पसरलेली आहेत, १५ ते २० दिवसाला पाणी मिळतो, सहा सहा महिने विद्युत खंब्यावर लाइट बंद असते, विशेष म्हणजे बीड शहरातील रस्ते अत्यंत खराब झालेले आहे म्हणून रोड रस्ते नाल्यांची विकास कामे त्वरित सुरू करण्यात यावी तसेच कंकालेश्वर मंदिर ते हजरत शहेंशावली दर्गा रोडवरील पूल तुटलेले आहे तुटलेल्या पुलावरून अनेक नागरिक नाल्यांमध्ये पळून दुःखापत होत आहे, तसेच किल्ल्या मैदानावर नगरपरिषदेचे शादीखाना बांधलेला होता त्याची देखभाल नसल्यामुळे ते खंडर झाले असून त्याची दुरुस्ती करून घ्यावी, नगरपरिषदेतील भ्रष्टाचार दिसून येत आहेत त्यावर आळा बसला पाहिजे, नविन रोड नाल्या होतांना दिसत नाहीये मात्र कोट्यवधीचे बिले निघालेले आहेत. जुनेच कामाचे नवे किंवा डबल बिले दिली जाते असे वाटत आहे म्हणजे बीड नगरपरिषदेत प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार वाढलेला दिसून येत आहे, प्रशासकाच्या नावाखाली मनमानी अंधाधुंद कारभार सुरू आहेत. स्वच्छतेसाठी,पाणीसाठी, लाईटसाठी आणि रस्ते नाल्यांचे विकास कामांसाठी आपण स्वतः विशेष लक्ष द्यावे अशी मागणी जिल्हाधिकारी साहेब आणि व मुख्याधिकारी साहेब यांच्याकडे केली आहे यावेळी रहिम भाई,महेबुब इनामदार,वडमारे साहेब,शेख मुबारक,हमीद भाई, मोमीन अझहर आदी मान्यवर उपस्थित होते.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. २३ ऑगस्ट २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### बीड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिव यांच्या १२ जून २०२५ रोजीच्या आदेशानुसार बीड जिल्हा परिषदेच्या ६१ निवडणूक विभाग आणि त्याअंतर्गत निर्वाचक गणात गेवराई-१८, माजलगाव-१२, वडवणी-०४, बीड-१६, शिरुर कासार-०८, पाटोदा-०६, आष्टी-१४, केज-१४, धारुर-०६, परळी-१२ आणि अंबेजोगाई-१२ अशा एकूण जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या १२२ निर्वाचक गणासाठी निवडणूक प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार आज दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध होणार आहे. ही अधिसूचना बीड जिल्हाधिकारी कार्यालय, बीड जिल्हा परिषद कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये आणि सर्व पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध असेल. सर्व संबंधितांनी अंतिम प्रभाग रचनेचे अवलोकन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

### आता तिरुपती हॉस्पिटलमध्ये महात्मा फुले योजनेअंतर्गत होणार सर्व प्रकारच्या मोफत शस्त्रक्रिया

**शासनाच्या आरोग्य योजनेचा लाभ घेण्याचे मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांचे आवाहन**

**बीड । प्रतिनिधी**






बीड शहरात सहा महिन्याभरापूर्वी सुरू झालेले सुप्रसिद्ध मनका विकार तज्ञ तथा अस्थिरोग तज्ञ डॉ बालाजी नवले यांच्या तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि स्पाईन केअर सेंटर नगर नाका बीड येथे शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सुरू झालेली आहे.. गरजू रुग्णांना एक रुपयाही खर्च न करता पूर्णपणे मोफत असणाऱ्या या शासनाच्या योजनेचा सर्व प्रकारच्या रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन तिरुपती हॉस्पिटलचे संचालक तथा मनकाविकार,अस्थिरोगतज्ञ डॉ बालाजी नवले यांनी केले आहे. तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये हाडासंबंधी, पोट विकार, मूत्रविकार, हृदयरोग,मधुमेह, कान, नाक ,घसा संबंधी सर्व योजनेमध्ये लागू असलेल्या सहभाग या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया आणि उपचार होणार आहेत.. तरीही गरजू रुग्णांनी तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल कागदपत्रासह येऊन लाभ घेण्याचे आवाहन तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि स्पाईन केअर सेंटर नगर नाका बीड च्या वतीने म नका विकास डॉ बालाजी नवले यांच्या वतीने करण्यात आले आहे कर्ज रुग्णांनी अपॉइंटमेंट साठी ७७७०००३२२९,८६६८२१२३३१ या दूरध्वनीवर संपर्क साधून हॉस्पिटलमध्ये विजिट करावी असे हॉस्पिटलच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# वारकरी संप्रदायाचा प्रसार श्री संत सेना महाराजांनी केला : ह.भ.प.जनार्धन महाराज चलवाड

## श्री संत सेना महाराजांनी समतेचा विचार मांडला : आमदार सौ.नमितानाई मुंदडा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

श्री संत सेना महाराज यांच्या ६२६ व्या पुण्यतिथीनिमित्त अंबाजोगाई येथे बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्रींचा अभिषेक व महापुजा, महाआरती, किर्तन, भक्तीगीत गायन आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमास उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ भाविक भक्त, सर्व समाज बांधवांनी घेतला. संत सेना महाराज प्रतिष्ठान






व नाभिक एकता महासंघाच्या वतीने आयोजित केलेल्या पुण्यतिथी सोहळा शहरातील श्री संत सेना महाराज व श्री संत नरहरी महाराज मंदिर, मुकुंदराज रोड, अंबाजोगाई येथे बुधवार, दि.२० ऑगस्ट रोजी श्रींचा अभिषेक व महापुजा, महाआरती, किर्तन, भक्तीगीत गायन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार सकाळी ७ ते ९ वाजता या वेळेत श्रीहरी (मामा) गवळी व माणिकराव (मामा) राऊत, विष्णु कचरे, पांडुरंग कचरे, बालाजी गोरे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापुजा करण्यात आली. सकाळी १० ते १२ वाजता या वेळेत ह.भ.प.जनार्धन महाराज चलवाड (श्री.जगद्गुरू तुकोबाराय पावनधाम, औरंगपुर) यांची किर्तन सेवा संपन्न झाली. यावेळी आपल्या सुश्राव्य किर्तनातून ह.भ.प.चलवाड यांनी संत सेना महाराज यांच्या संपूर्ण अध्यात्मिक जीवनावर आपल्या प्रवचनातून पांडुरंग व सेना महाराज यांच्या भक्ती बद्दल सांगितले संत सेना महाराज हे संत ज्ञानेश्वर महाराज, संत रोहिदास महाराज, संत नामदेव महाराज यांच्या समकालीन संत होते. जन्म राजस्थानात झाला. परंतु, महाराष्ट्रात आल्यानंतर वारकरी ▶ **उर्वरित पान २ वर**

# बजरंग बली की... हिंदु गर्जना घुमणार

## बीड शहरात सामूहिक हनुमान चालीसा निमित्ताने हिंदू युवकांचे एकत्रिकरण : किशन चौहान, प्रशांत डोरले

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात गाजणारा कुठलाही विषय असला तरी त्याची सुरुवात ही बीडच्या मातीतून झालेली असते, बीड जिल्ह्यात आजपर्यंत हिंदुत्ववाशी संबंधित विविध संघटना, प्रमुख नेतृत्व, युवकांचे टीम काम करत आहेत. यातूनच बीड शहरात राज्यात गाजलेली प्रभु श्रीराम जन्मोत्सव, भव्य महिलांची कावड यात्रा, विविध महापुरुषांच्या जयंती उत्सव सारख्या अनेक प्रेरणादायी महोत्सवांच्या माध्यमातून समाज प्रबोधनसोबतच एक चळवळ उभी करण्यात आलेले



आहे, त्याच प्रमाणे बीड शहरातील समस्त राष्ट्रप्रेरित विचारांच्या युवकांनी एकत्रित बैठक घेत सामूहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हिंदु धर्माच्या दृष्टीने पवित्र ▶ **उर्वरित पान २ वर**

### अध्यात्म सोबतच धर्म नेतृत्व देणार युवकांना दिशा

**बीड शहरात होणाऱ्या या कार्यक्रमास जिल्ह्यातील आध्यात्मिक क्षेत्रातील प्रमुख साधुसंत, महंत, गुरुवर्य सोबतच हिंदू धर्माच्या कार्यात सदैव सक्रीय असणारे आ. संजय केणेकर हे प्रमुख उपस्थित राहणार असून युवकांना या व्यासपीठावरून धर्मकार्य करताना अध्यात्माचे ज्ञान ही मिळणार आहे.**

# 24 तासांत मिसिंग प्रकरणाचा उलगडा

## महिलेच्या खुनाचा बीड पोलिसांचा पर्दाफाश ; आरोपी महिला अटकेत

**बीड । प्रतिनिधी**

शिवाजीनगर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत मिसिंग प्रकरणाचा उलगडा करत खुनाचा गुन्हा उघडकीस आणला आहे. अयोध्या राहुल व्हरकटे (वय २७, रा. लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड) ही महिला २० ऑगस्ट रोजी हरवल्याची तक्रार तिचा भाऊ ज्ञानेश्वर मुरनर यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दाखल केली होती. दरम्यान, २१ ऑगस्ट रोजी मिळालेल्या माहितीनुसार अयोध्या हिचा खून झाल्याचे समोर आले. तिचा मृतदेह उमरद (जहांगीर), ता. व जि. बीड शिवारातील झुडपात आढळून आला. तपासादरम्यान समोर आले की, वृंदावणी सतिष फरतारे व तिचा मुलगा यांनी संगनमत करून अयोध्या हिचा खून केला. पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने मृतदेह झुडपात फेकून दिला होता. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. ४३९/२०२५ कलम १०३, २३८, ३(५) भा.दं.वि. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी वृंदावणी फरतारे हिला अटक करण्यात आली आहे. या कारवाईत पोलीस अधीक्षक नवनित कावत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी हानपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन क्षीरसागर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास मोरे, पो.उप.नि. धोत्रे, स.फौ. कदम, पो.ह. रविंद्र आघाव, संतोष राऊत, म.पो.ह. मिरा पाटील, शितल जोगदंड, पो.कॉ. शुभम सोनवणे, अशोक राडकर, दिलीप राठोड, विलास कांदे, बाळु रहाडे, धनंजय येवले, अनिल घटमाळ, राजाभाऊ जाधव, नवनाथ डाके आदींचा सहभाग होता.

# अंतर राष्ट्रीय युवा दिनानिमित्त रॅली संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रतिबंध व नियंत्रण कक्ष जिल्हा रुग्णालय बीड यांच्यावतीने अंतर्गत इंटेन्सिफाइड आयसी कॅम्पेनिंग आंतरराष्ट्रीय युवा दिन निमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते सदर रॅलीचे उद्घाटन बीड जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर संजय राऊत पीएसआय जाधवर



सर यांच्या हस्ते झाले रॅलीसाठी सुरुवात श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक इथून झाली कारंजा बलभीम चौक सुभाष रोड लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक मार्गे बस स्टॅन्ड संभाजी महाराज स्टेडियम या ठिकाणी उपस्थित झाली जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री सुहास कुलकर्णी यांनी युवा दिन महत्व इंटेन्सिफाइड आयसी कॅम्पेनिंग बाबत थोडक्यात माहिती दिली यानंतर जनार्दन माचपलले समुपदेशक यांनी सर्व उपस्थित युवक युती यांना एचआयव्ही मुक्त जगण्याची शपथ दिली राष्ट्रगीताने रॅलीचा समारोप करण्यात आला.व सहभागी युवक युवतींना अल्पोपहार देण्यात आला. सदर कार्यक्रमाचे ▶ **उर्वरित पान २ वर**



*कृषी प्रधान संस्कृती मधला महत्त्वाचा उत्सव म्हणजे बैलपोळा नेहमीप्रमाणे गावी , म्हाळस जवळा,येथे मोठ्या उत्साहात आणि आनंदात सहकुटुंब बैलपोळा साजरा करताना माजी जिल्हा प्रमुख कुंडलिक बाप्पू खांडे . याप्रसंगी श्री मोहिनीराज चरणी प्रार्थना केली की बळीराजा सुखी होवो त्याचे शेत शिवार भरून येवो..!*



*परंपरागत बैल पोळा हा सण आगदी उत्साहात व आनंदात साजरा युवा कार्यकर्ते अशोक दादा ढोले पाटील व सौरभ मुंडे उपस्थित करण्यात आला घोसापुरी गावांमध्ये बैलाला पुरणपोळी नैवेद्य दाखवून कुटूंबातील सर्व व गावातील सहकारी यांच्या सोबत सण साजरा करण्यात आला. हा सण आमच्या शेतकरी बळीराजाचा असून या दिवसाला खूप महत्त्व आहे... वर्षभर राब राब राबणाऱ्या बैलाविषयी कृतज्ञता दाखविणारा हा दिवस आहे...या वर्षी पाऊस चांगला झाल्याने शेतकरी बळीराजा सुखावला आहे...मी कुठेही आसलो तरी आजपर्यंत बैलपोळा सणांसाठी आवर्जून गावी जात आसतो... तरी शेतकरी बळीराजाच्या जिवनात समृद्धता यावी हीच आई जगदंबे चरणी प्रार्थना केली.*

# मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा: डीवायएफआयचा आंदोलनाचा इशारा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरात व परिसरात मोकाट कुत्र्यांची होत असलेली वाढ ही शहरातल्या नागरिकांसाठी खूप मोठी समस्या झाली. याबाबत डीवायएफआय संघटनेच्या वतीने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकाद्वारे करण्यात आली आहे. नागरिकांनी नगर पालिकेला अनेकवेळा कळवण्यात आलेले आहे. परंतु पालिकेने यावर कोणतही कार्यवाही केलेली नाही. या कडे पालिकेने लक्ष घालून ही समस्या सोडवावी अन्यथा



संघटेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल. शहरातील विविध भागात मोकाट भटकणार्या व नागरिकांवर जीवघेणा हल्ला करणार्या कुत्र्यामुळे अंबाजोगाई मध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सकाळी शाळेत जाणारे मुले, मॉर्निंग वॉक करणारे नागरिक, रात्री उशिरा कामावरून घरी परतणारे कर्मचारी कामगारांवर ही मोकाट ▶ **उर्वरित पान २ वर**

**● अंबाजोगाई शहरातील भटक्या कुत्र्यांवर नगर परिषदेने योग्य ती कारवाई करावी.जेणेकरून मोकाट कुत्रे नागरिकांना त्रास देणार नाहीत. एखाद्या व्यक्तीला कुत्रा चावला व त्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्याला जबाबदार कोण ? कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात यावे. जेणेकरून कुत्र्यांची संख्या वाढणार नाही. अंबाजोगाई नगर परिषदेने या समस्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी.– सुहास चंदनशिव, डीवायएफआय जिल्हाउपाध्यक्ष**

**● निर्बिजीकरण व भटक्या कुत्र्याच्या बंदोबस्त बाबत पालिकेने काय केले ?– निर्बिजीकरण व भटक्या कुत्र्याच्या बंदोबस्त करण्यासाठी नगर पालिकेने आतापर्यंत काय उपाय योजना केली. यासाठी किती पैसे खर्च केले ?किंवा निर्बिजीकरण व भटक्या कुत्र्याच्या बंदोबस्त करण्यासाठी पैसे नाहीत. ज्यामुळे मोकाट कुत्र्यांचा आकडा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. याचे उत्तर पालिका प्रशासनाने द्यावे.**

# लिंबागणेश परीसरात मुग काढणीला वेग पाऊस - टंचाई मजुरी शेतकऱ्यांना तिहेरी पेच

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

मृग नक्षत्रात पेरणी झाल्यानंतर उत्पादनाची हमी असल्याने यंदा मुग-उडीद या पिकांचे क्षेत्र लक्षणीय वाढले आहे. सोयाबीनला पर्याय म्हणून शेतकऱ्यांनी मुगाला प्राधान्य दिले असून प्रारंभीच्या सततच्या पावसामुळे पिकांची वाढ समाधानकारक झाली. परंतु ऐन काढणीच्या वेळी झालेल्या भीज पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.



सध्या लिंबागणेश शिवारात मुग काढणीला वेग आला आहे. मात्र गेल्या आठवड्यातील रिमझिम पावसामुळे मजुरांचे काम खंडित होत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. भिज पावसाने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना आता मजुरांच्या टंचाईचा व अधिक मजुरीच्या मागणीचा सामना करावा लागत आहे. लिंबागणेशचे शेतकरी बालासाहेब जाधव यांनी सांगितले की, मुग काढणीसाठी मोठ्या प्रमाणावर मजुरांची गरज असते. हिश्शेवारी पद्धतीने २ हिस्सा शेतमालकाला व १ हिस्सा मजुरांना असा व्यवहार होतो. पण मजुरांना आणणे-नेणे याचा खर्च शेतकऱ्यालाच करावा लागतो. त्यातच काढणीस विलंब झाल्याने शेंगा फुटणे, मुग पांढरा पडणे व कर येणे यामुळे पिकांचे नुकसान होत आहे. मजुरांची कमतरता आणि त्यांच्या वाहतुकीवरील खर्चामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक भुर्दंड पडत असून मुग काढणीच्या हंगामात शेतकरी हतबल झाल्याचे चित्र सध्या लिंबागणेश परिसरात पाहायला मिळत आहे.



*पारंपारिक महाराष्ट्र संस्कृतीचे जतन करताना, शेतकरी मित्र व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के तसेच जिल्हा परिषद माजी उपाध्यक्षा सौ. जयश्रीताई राजेंद्र मस्के यांनी सहपरिवार बैलांची पूजा करून शेतकरी बांधवांचे जीवनाधार असलेल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.हि परंपरा आपल्या मातीशी, संस्कृतीशी जोडणारी आणि शेतकऱ्यांच्या श्रमाला अभिवादन करणारी आहे. बैल शेतकऱ्यांचा सखा, शेतकऱ्यांची खरी ताकद, तर कृषी संस्कृती ही आपल्या देशाची शान! परंपरेला सलाम । संस्कृतीला वंदन । शेतकऱ्यांना हार्दिक शुभेच्छा.*